मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » रविवार, दि. 26 जुलै 2026 | पान- 1

# मोशी दुर्घटनेप्रकरणी अग्निशमन अधिकाऱ्याला नोटीस

**प्रत्यक्ष पाहणी न करता इमारतीला 'फायर एनओसी', मोशी कचरा डेपोतील 'वेस्ट टू एनर्जी' प्रकल्प दुर्घटना प्रकरणात मोठी कारवाई करण्यात आली आहे.**

**पिंपरी | प्रतिनिधी**

मोशी दुर्घटनेप्रकरणी अग्निशमन अधिकाऱ्याला कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आली आहे. कोसळलेल्या इमारतीची जागेवर जाऊन प्रत्यक्ष पाहणी न करता ना-हरकत दाखला (फायर एनओसी) देऊन हलगर्जीपणा केल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे.

अग्निशमन विभागाचे केंद्र अधिकारी ऋषिकांत चिपाडे यांना नोटीस बजावली असून खुलासा मागविला आहे. पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या मोशी कचरा डेपोतील 'वेस्ट टू एनर्जी' प्रकल्पाची प्रशासकीय इमारत कोसळून नऊ कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाला आहे. याप्रकरणी महापालिकेच्या पर्यावरण अभियांत्रिकी विभागाचे मुख्य अभियंता संजय कुलकर्णी व कार्यकारी अभियंता योगेश आल्हाट यांचे निलंबन करण्यात आले आहे.



महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी चिपाडे यांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. इमारतीच्या बांधकामासाठी सन २०१९ मध्ये तात्पुरता स्वरूपात ना-हरकत (फायर एनओसी) दाखला देण्यात आला होता. त्यानंतर २६ जुलै २०२३ रोजी बांधकाम परवानगी विभागाने सुधारित नकाशा मंजूर केला. या मंजुरीनुसार केवळ तळमजल्याच्या बांधकामास परवानगी होती. मात्र, त्याच दिवशी अग्निशमन विभागाकडून तीन मजली इमारतीला अंतिम ना-हरकत दाखला देण्यात आला. कोणत्याही प्रकारची छाननी, स्थळ पाहणी न करता अंतिम दाखला देण्यात आल्याचे प्रथमदर्शनी स्पष्ट होत असल्याचे आयुक्तांनी नोटिशीत नमूद केले आहे.

सुधारित मंजूर नकाशा आणि प्रत्यक्ष उभारलेल्या इमारतीत मोठी तफावत असतानाही ती वरिष्ठांच्या निदर्शनास आणून देण्यात आली नाही. परिणामी, पहिला व दुसरा मजला अनधिकृतपणे उभारला गेला. सुरक्षाविषयक नियमांचे पालन न झाल्यामुळेच ८ जुलैला अनधिकृत प्रशासकीय इमारत कोसळून भीषण दुर्घटना घडली. या प्रकरणात चिपाडे यांच्यावर महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम तसेच, राष्ट्रीय बांधकाम संहितेतील तरतुदींचे उल्लंघन केल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे. दुर्घटनेची जबाबदारी निश्चित करून निलंबित का करू नये अशी नोटीस चिपाडे यांना बजावली आहे.

मोशी येथील कचरा डेपोतील 'वेस्ट-टू-एनर्जी' प्रकल्पात झालेल्या भीषण दुर्घटनेची राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोग आणि राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोगाने गंभीर दखल घेतली आहे. दोन्ही आयोगांनी पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्त, समाज कल्याण आयुक्त तसेच पुणे जिल्हाधिकाऱ्यांना नोटिसा बजावत १५ दिवसांच्या आत सविस्तर अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत.

## दुर्घटना टाळण्यासाठी उपाययोजना काय?

**» तक्रारीत संबंधित दोषींविरुद्ध अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम, १९८९, नागरी हक्क संरक्षण अधिनियम, १९५५, हाताने मैला उचलण्यास प्रतिबंध व त्यांचे पुनर्वसन अधिनियम, २०१३ तसेच इतर लागू असलेल्या कायद्यांनुसार तातडीने कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. याशिवाय, दुर्घटनेस कारणीभूत ठरलेल्या परिस्थितीची सखोल चौकशी, संबंधित विभाग व अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करण्यासाठी करण्यात आलेली कार्यवाही, तसेच भविष्यात अशा प्रकारच्या दुर्घटना टाळण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या प्रतिबंधात्मक उपाययोजनांचा सविस्तर अहवालही आयोगांनी सादर करण्यास सांगितले आहे.**

# उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या हस्ते 'अजित पर्व'चे प्रकाशन

**प्रकाश जाधव लिखित पुस्तकातून दिवंगत अजितदादा पवार यांच्या राजकीय, प्रशासकीय आणि वैयक्तिक जीवनप्रवासाचा संशोधनाधारित वेध**

**पुणे | प्रतिनिधी**

दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या जीवनावर आधारित प्रकाश जाधव लिखित 'अजित पर्व'या चरित्रग्रंथाचे प्रकाशन उप मुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या हस्ते करण्यात आले.

शनिवारी, (दि. २४ जुलै) गणेश कला क्रीडा मंच, पुणे येथे आयोजित केलेल्या कार्यक्रमात लेखक प्रकाश जाधव, कृषी मंत्री दत्तामामा भरणे, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, हार्ट पब्लिकेशन, पुणेचे प्रकाशक विनोद शिंदे, अॅड. लक्ष्मण रानवडे, सामाजिक कार्यकर्ते मारुती भापकर,



मराठा सेवा संघाचे शहराध्यक्ष आबासाहेब ढवळे, वसंतराव पाटील, संभाजी ब्रिगेडचे शहराध्यक्ष सतीश काळे, किरण खोत, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिक आदी उपस्थित होते.

'अजित पर्व' हे पुस्तक एका वेगळ्या संकल्पनेवर आधारित आहे. या चरित्र ग्रंथाची सुरुवात अजित पवार यांच्या आयुष्यातील अखेरच्या दिवसापासून होते आणि त्यानंतर त्यांच्या जीवन प्रवासाचा मागोवा घेत घेत वाचकांना त्यांच्या बालपण पर्यंत घेऊन जाते. पुस्तकात अजित पवार यांचे राजकीय यश, त्यांची प्रशासकीय कार्यपद्धती, वेळेचे काटेकोर नियोजन, विकासाभिमुख दृष्टी, निर्णयक्षमता, स्पष्टवक्तेपणा, काका पुतण्याच्या नात्यातील गुंतागुंत, त्यांच्याभोवती निर्माण झालेले गैरसमज आणि त्यामागील वास्तव यांचा वस्तुनिष्ठ अभ्यास करण्यात आला आहे.

लेखकाने भावनेपेक्षा संशोधन, पुरावे, विविध मुलाखती आणि दस्तावेजांच्या आधारे हे लेखन केले आहे. यातून अजित पवार यांचे वास्तववादी चरित्र म्हणून उभे राहते. अखेरचा क्लिअरन्स, प्रशासकीय हुकूमत, शिल्पकार आधुनिक शहरांचा, अधुरी कहाणी : एक राजकीय संघर्ष, शिस्तबद्ध अकादमी, जनतेचा दादा, अंत व अनंत आणि शेवटी 'उगम व जडणघडण' अशा आठ प्रकरणांतून अजित पवार यांचा जीवनपट उलगडत जातो. ही मांडणीच या पुस्तकाला इतर चरित्र ग्रंथापेक्षा वेगळी ओळख निर्माण करून देते, त्यामुळे हे पुस्तक वाचनीय आणि संदर्भ ग्रंथ म्हणून उपयोगी ठरेल असे प्रकाश जाधव यांनी सांगितले.

# पवना धरण 100 टक्के भरले; पिंपरी-चिंचवडमधील नदीकाठच्या नागरिकांना सतर्कतेचा इशारा

## धरणातून 9 हजार क्युसेकपर्यंत विसर्गाची तयारी; पाणीपातळी वाढल्याने पवना नदी दुथडी भरून वाहू लागली, पाणीकपात रद्द होण्याची शक्यता

**पिंपरी | प्रतिनिधी**

मावळ तालुक्यातील पवनानगर येथील पवना धरण शुक्रवार (दि. २४) १०० टक्के भरले. पावसाची संततधार आणि धरणात वाढत असलेला पाणीसाठा लक्षात घेऊन धरणातून शुक्रवार सकाळपासून ८०० क्युसेकने विसर्ग करण्यास सुरुवात करण्यात आली आहे, तर तो टप्प्याटप्प्याने विसर्ग वाढत सायंकाळी सातला एकूण ९००० क्युसेकपर्यंत केला जाणार आहे; पात्र फुगल्याने पवना नदीस पूर आला असून, नदीकाठच्या नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

पिंपरी-चिंचवड शहराचे तहान भागविणारे पवना धरण अखेर, शुक्रवारी १०० टक्के भरले. धरणाच्या पाणलोट क्षेत्रामध्ये तसेच, घाटमाथ्यावर पाऊस पडत असल्याने धरणात पाणीसाठा वाढतच आहे. पवना धरणातील पाणीपातळी नियंत्रित करण्यासाठी सकाळी नऊपासून पवना नदीपात्रात विद्युतगृहद्वारे ८०० क्युसेकने विसर्ग सुरू करण्यात आला.

धरण क्षेत्रात पावसाची संततधार कायम असल्याने टप्प्याटप्प्याने विसर्ग वाढवण्यात आला. सायंकाळी सातपासून विद्युतगृहातून १४०० क्युसेकने आणि सांडव्यातून ४२०० क्युसेक असे एकूण ५६०० क्युसेकने विसर्ग सुरू करण्यात आला आहे. रात्री आठला एकूण विसर्ग ७००० क्युसेक करण्यात आला. पावसाचे वाढते प्रमाण लक्षात घेऊन विसर्ग ९००० क्युसेक इतका केला जाणार आहे.



### शहरात २४. ४० किलोमीटर लांबीचे पवनेचे पात्र

» पिंपरी-चिंचवड शहरातून मध्य भागातून पवना नदी २४. ४० किलोमीटर अंतर वाहते. किवळे ते सांगवी असे दोन्ही बाजूचे पात्र शहरात आहे. सांगवी येथे पवनेचा मुळा नदीशी संगम होतो. नदीकाठची घरे, लोकवस्ती, हाऊसिंग सोसायटी आदी भागांत पुराचे पाणी शिरते.

त्यामुळे पवना नदीचे पात्र फुगले असून, ती दुथडी भरून वाहत आहे. त्यामुळे नदीकाठच्या लोकवस्तीत पाणी शिरण्याचा धोका निर्माण झाला आहे. मागील २४ तासांत एकूण ६८ मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे. सततच्या पावसामुळे ओढे, नाले व नदीच्या पाणीपातळीत वाढ होण्याची शक्यता आहे. नदीपात्रातील साहित्य, शेतीचे अवजारे, कृषी पंप, जनावरे नदीपात्रासापसून सुरक्षित ठिकाणी इतरत्र हटवण्यात यावेत. तसेच नदीकाठच्या रहिवाशांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे

पिंपरी-चिंचवड शहराच्या पाणीपुरवठ्याच्या दृष्टीने मोठा दिलासा मिळाला आहे. धरणातील पाणीपातळी नियंत्रित ठेवण्यासाठी टप्प्याटप्प्याने विसर्ग वाढविण्यात येत असून तो ९,००० क्युसेकपर्यंत नेण्याची तयारी करण्यात आली आहे. सततच्या पावसामुळे पवना नदी दुथडी भरून वाहत असल्याने नदीकाठच्या गावांतील नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे. नदीपात्रातील साहित्य, शेतीची अवजारे, कृषी पंप व जनावरे सुरक्षित ठिकाणी हलविण्याच्या सूचना देण्यात आल्या असून, अधिकृत सूचनांचे पालन करण्याचे आवाहनही करण्यात आले आहे.

### पवना धरण पूर्ण क्षमतेने भरले

» मावळ तालुक्यातील पवना धरण १०० टक्के भरल्याने पिंपरी-चिंचवड शहराच्या पाणीपुरवठ्याच्या दृष्टीने मोठा दिलासा मिळाला आहे. धरणातील पाणीपातळी नियंत्रित ठेवण्यासाठी टप्प्याटप्प्याने विसर्ग वाढविण्यात येत असून तो ९,००० क्युसेकपर्यंत नेण्याची तयारी करण्यात आली आहे. सततच्या पावसामुळे पवना नदी दुथडी भरून वाहत असल्याने नदीकाठच्या गावांतील नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे. नदीपात्रातील साहित्य, शेतीची अवजारे, कृषी पंप व जनावरे सुरक्षित ठिकाणी हलविण्याच्या सूचना देण्यात आल्या असून, अधिकृत सूचनांचे पालन करण्याचे आवाहनही करण्यात आले आहे.

### शहरातील १५ टक्के पाणीकपात रद्द होणार ?

» पिंपरी-चिंचवड शहरात २० जूनपासून १५ टक्के पाणीकपात लागू करण्यात आली आहे. पवना धरण शुक्रवारी १०० टक्के भरले आहे. त्यामुळे महिन्याभरापासून सुरू असलेली पाणीकपात रद्द केली जाणार का, असा प्रश्न शहरवासीयांकडून उपस्थित केला जात आहे. त्यासंदर्भात जलसंपदा विभागाशी चर्चा सुरू आहे, असे महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाकडून सांगण्यात आले.

# हिंजवडी ते बालेवाडी मेट्रो सेवेला हिरवा कंदील; मार्गिका-3ला सुरक्षा आयुक्तांची मंजुरी

## माण ते आर. के. लक्ष्मण म्युझियमदरम्यान 12 स्थानकांवरून धावणार मेट्रो; ताशी 80 किमी वेगाने प्रवासी सेवा सुरू होण्याचा मार्ग मोकळा

**पिंपरी | प्रतिनिधी**

हिंजवडी आयटी पार्कला शहराशी जोडणाऱ्या पुणे मेट्रो मार्गिका-३च्या प्रवासी सेवेचा मार्ग आता अधिकृतरीत्या मोकळा झाला आहे. नागरी विमान वाहतूक मंत्रालयांतर्गत कार्यरत मेट्रो रेल्वे सुरक्षा आयुक्तांनी (सीएमआरएस) माण स्थानक ते आर. के. लक्ष्मण म्युझियम (बालेवाडी) या १२ स्थानकांदरम्यानच्या टप्प्यावर प्रवासी वाहतूक सुरू करण्यासाठी २३ जुलै रोजी तात्पुरते प्राधिकरण प्रदान केले आहे.

या मंजुरीमुळे सीबीटीसी सिग्नलिंग प्रणालीअंतर्गत 'एटीपी' मोडवर मेट्रो ताशी ८० किलोमीटर या कमाल वेगाने धावू शकणार आहे. सर्व वैधानिक तपासण्या, चाचण्या आणि सुरक्षा मानकांची पूर्तता झाल्यानंतरच ही मंजुरी देण्यात आली आहे.



सुमारे १३ किलोमीटर लांबीचा हा दुहेरी मार्ग ७५० व्होल्ट डीसी थर्ड रेल ट्रॅक्शन प्रणालीवर कार्यरत राहणार आहे.

मेट्रो रेल्वे सुरक्षा आयुक्तांनी ५ ते ८ जुलै या कालावधीत 'पुणे आयटी सिटी मेट्रो रेल लिमिटेड' (PITCMRL) च्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत या मार्गाची सखोल पाहणी केली होती. प्राथमिक तपासणी आणि त्यानंतरच्या आढाव्यादरम्यान सुरक्षा आयुक्तांनी उपस्थित केलेल्या सर्व मुद्द्यांवरील पूर्तता अहवाल कंपनीने सादर केला. प्रत्यक्ष मंजुरी देण्यापूर्वी या मार्गावर मेट्रोची निश्चिती चाचणी यशस्वीरीत्या पार पडली. तसेच, सुरक्षा आयुक्तांनी सर्व प्रमुख मेट्रो प्रणालींशी संबंधित तांत्रिक मंजुरी, आयएसए प्रमाणपत्र, शासनाच्या मुख्य विद्युत निरीक्षकांचे (CEIG) ना-हरकत प्रमाणपत्र, दूरसंचार विभागाचा (DOT) परवाना, सर्व १२ स्थानकांसाठी अग्निशमन विभागाची ना-हरकत प्रमाणपत्रे, तसेच स्थापत्य, ट्रॅक, सिग्नलिंग, टेलिकॉम आणि रोलिंग स्टॉक प्रणालींसंदर्भातील सर्व प्रमाणपत्रांची काटेकोर पडताळणी केली.

> हिंजवडी ते शिवाजीनगर या 'पुणे मेट्रो मार्गिका-३' प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्याला मिळालेली सुरक्षा आयुक्तांची मंजुरी ही पुणेकरांसाठी आणि पीएमआरडीएसाठी समाधानकारक बाब आहे. हिंजवडी आयटी पार्क परिसरातील वाहतूककोंडी कमी करण्यासाठी आणि नागरिकांना सुरक्षित, वेगवान तसेच पर्यावरणपूरक सार्वजनिक वाहतूक व्यवस्था उपलब्ध करून देण्यासाठी हा प्रकल्प मैलाचा दगड ठरणार आहे. या मंजुरीमुळे प्रकल्पाने निर्णायक टप्पा गाठला असून, उर्वरित प्रक्रिया वेगाने पूर्ण करून ही प्रवासी सेवा लवकरच नागरिकांसाठी सुरू करण्यास पीएमआरडीए प्रशासन कटिबद्ध आहे.
>
> **- डॉ. अभिजित चौधरी, आयुक्त, पीएमआरडीए.**

# भूसंपादनासाठी एकाचवेळी प्रस्ताव पाठवा; एचसीएमटीआरबाबत राज्य शासनाचे पालिकेला निर्देश

## पुणे, पिंपरी-चिंचवड आणि पीएमआरडीए हद्दीतील वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी विशेष समिती; महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांची माहिती.

**पुणे | प्रतिनिधी**

शहरातील अंतर्गत वर्तुळाकार मार्ग अर्थात एचसीएमटीआरसाठी आवश्यक जागेपैकी ५० टक्के जागा महापालिकेच्या ताब्यात आहे. ३० टक्के जागा सरकारच्या विविध विभागांची आहे, तर २० टक्के जागा खासगी आहे. यापैकी सरकारच्या विविध विभागांची ३० टक्के जागा संपादित करण्यासाठी एकच प्रस्ताव पाठवावा, अशी सूचना सरकारच्या वतीने केल्याची माहिती महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी गुरुवारी पत्रकारांशी बोलताना दिली.

पुणे, पिंपरी-चिंचवड महापालिका आणि पीएमआरडीएच्या हद्दीतील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी एकात्मिक विकास आराखडा तयार करण्यासाठी, तसेच त्यानुसार अंमलबजावणी करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखालील द्विस्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे. मंगळवारी अतिरिक्त मुख्य सचिव लोकेश चंद्र यांच्या अध्यक्षतेखाली शहरातील एचसीएमटीआर रस्त्याबाबत प्राथमिक बैठक झाली.

या बैठकीमध्ये शहरातील ३६ किलोमीटरच्या उन्नत रिंगरोडसाठी आवश्यक असलेल्या जागेसंदर्भाने चर्चा झाली. या बैठकीला महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. एचसीएमटीआर मार्गापैकी ५० टक्के मार्ग हा अस्तित्वात असलेल्या २४ मी. रुंद आणि त्यावरील रस्त्यांवरून करण्यात येणार आहे, तसेच वन, कृषी अशा सरकारच्या विविध विभागांच्या जागांमधून ०४.३ कि.मी. मार्ग जाणार आहे.

नदी, नाल्यांवरून ०४.२८ किलोमीटर मार्ग जाणार आहे. सुमारे ०५.३ किलोमीटर रस्ता खासगी जागेतून जाणार आहे. अस्तित्वातील रस्त्यांवर भूसंपादनाची गरज नाही, तसेच नदी, नाल्यावरील मार्गावरही पूल उभारणार आहेत. सरकारी जमिनीवरून जाणाऱ्या मार्गिकांसाठी ज्या विभागांची जागा आहे, त्या विभागांचे प्रस्ताव एकाचवेळी मान्यतेसाठी शासनाकडे पाठवावेत. त्यास एकाचवेळी परवानगी देण्यात येईल, असे सरकारने स्पष्ट केले आहे.

खासगी जागेतील भूसंपादनासाठी साधारण एक हजार ३०० कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे, तर संपूर्ण प्रकल्पासाठी साधारण १० हजार कोटी रुपये अपेक्षित आहे, असेही राम यांनी या वेळी सांगितले.पावसाच्या प्रमाणानुसार व येव्यानुसार विसर्ग पुन्हा कमी/जास्त करण्याची शक्यता आहे याची नोंद घेण्यात यावी. तरी सर्वांना याद्वारे विनंती करण्यात येते की, कृपया नदीपात्रात उतरू नये. आणि नदीपात्रात काही तत्सम साहित्य अथवा जनावरे असल्यास तात्काळ हलविण्यात यावीत. कृपया सखल भागातील संबंधीत नागरीकांना सूचना देण्यात याव्या आणि उचित कार्यवाही करण्यात यावी.सर्वांनी योग्य ती खबरदारी व दक्षता घ्यावी. माहिती साठी सविनय सादर.




### वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी महत्त्वाचा प्रकल्प

**» पुणे, पिंपरी-चिंचवड आणि पीएमआरडीए हद्दीतील वाढती वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी एचसीएमटीआर हा महत्त्वाचा प्रकल्प मानला जात आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखालील समितीच्या मार्गदर्शनाखाली प्रकल्पाचे नियोजन सुरू आहे. उन्नत रिंगरोड, विद्यमान रस्त्यांचा वापर आणि आवश्यक पूल उभारणीच्या माध्यमातून शहरातील वाहतूक अधिक सुलभ करण्याचा उद्देश आहे. शासकीय मंजुरीनंतर प्रकल्पाच्या अंमलबजावणीला गती मिळण्याची अपेक्षा आहे.**

### ५० टक्के जागा महापालिकेच्या ताब्यात

**» शहरातील अंतर्गत वर्तुळाकार मार्ग (एचसीएमटीआर) प्रकल्पासाठी आवश्यक जागेपैकी ५० टक्के जागा महापालिकेच्या ताब्यात आहे. सुमारे ३० टक्के जागा विविध शासकीय विभागांची, तर २० टक्के जागा खासगी मालकीची आहे. शासकीय विभागांच्या जमिनींसाठी स्वतंत्र प्रस्ताव न पाठवता एकत्रित प्रस्ताव शासनाकडे पाठविण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्यामुळे मंजुरी प्रक्रिया अधिक वेगाने पूर्ण होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.**

### खासगी भूसंपादनासाठी १,३०० कोटींची गरज

**» एचसीएमटीआर मार्गातील सुमारे ५.३ किलोमीटर रस्ता खासगी जागेतून जाणार असल्याने त्या भूसंपादनासाठी अंदाजे १,३०० कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. तर संपूर्ण एचसीएमटीआर प्रकल्पासाठी सुमारे १० हजार कोटी रुपयांचा खर्च होणार आहे. अस्तित्वातील २४ मीटर व त्यापेक्षा रुंद रस्त्यांवर भूसंपादनाची गरज नसून नदी-नाल्यांवर आवश्यक ते पूल उभारण्यात येणार आहेत.**

---

# एसआयआर मोहिमेत बीएलओंपुढे पेच! चुकीच्या माहिती आधारे मतदाराचे नाव वगळल्यास कारवाई

## विशेष सखोल पुनरीक्षण मोहिमेत बीएलओंना प्रत्येक वगळलेल्या नावाची माहिती देणे बंधनकारक; चुकीच्या माहितीवर थेट कारवाईची टांगती तलवार.

**पुणे | प्रतिनिधी**

मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षण मोहिमेत म्हणजेच एसआयआर प्रक्रियेत मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांना (बीएलओ) मतदार यादी प्रसिद्ध होण्यापूर्वी नावे वगळलेल्या प्रत्येक मतदाराची माहिती द्यावी लागणार आहे. त्यामध्ये चुकीच्या माहितीच्या आधारे मतदारांचे नाव वगळले असल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित अधिकाऱ्यावर कारवाई होणार आहे. त्यामुळे बीएलओंपुढे मोठा पेच निर्माण झा आहे.

प्रत्येक मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्याला एका मतदान केंद्रावरील सुमारे ३०० ते २१०० मतदारांची पडताळणी आणि डिजिटायझेशन करायचे आहे. ही संख्या सरासरी १२०० ते १४०० इतकी आहे. शहरी भागात अनेक मतदार २००२ ते २०२५ या काळात विखुरले आहेत. त्यातील काही मृत, तर काही स्थलांतरित झाले आहेत. त्यामुळे मतदार याद्यांमध्ये त्यांचे पत्ते अपूर्ण आहेत.

नव्याने मतदारसंघांत दाखल झालेले मतदार शेजाऱ्यांच्या ओळखीतील नाहीत, तसेच राजकीय पक्षांशीही संबंधित नाहीत. त्यातच त्यांचे मोबाइल क्रमांकही यादीत नसल्याने त्यांच्याशी संपर्क होत नाही. त्यातच काही जुने मतदार या अधिकाऱ्यांना सहकार्य करत नसल्याचा बीएलओंचा अनुभव आहे. त्यामुळे या मतदारांपर्यंत कसे पोचायचे, असा प्रश्न या बीएलओंपुढे निर्माण झाला आहे.

मृत मतदार असेल, तर मृत्यूचा दाखला, स्थलांतरीत असेल, तर मतदार यादीतील पत्त्यावर न आढळल्यास त्याचा तीन वेळा केलेला पंचनामा, अनुपस्थित मतदारांबाबतही पंचनामा आणि दुबार असलेल्या मतदारांचा दुसऱ्या मतदारसंघातील नावाचा पुरावा सादर केल्याशिवाय बीएलओंना त्यांचे काम पूर्ण करता येणार नाही, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.



### ३५ लाख अर्जांचे डिजिटायझेशन पूर्ण

**» जिल्ह्यात ९० लाख ८० हजार १७३ मतदार असून, या मोहिमेत प्रत्येक मतदाराला स्वतंत्र गणना अर्ज देण्याचे काम येत्या ८ ऑगस्टपर्यंत करायचे आहे. मात्र, मतदार यादीमधील पत्त्यांचा घोळ कायम असल्याने मतदान केंद्रस्तरीय अधिकारी आतापर्यंत केवळ ६० लाख ३९ हजार १२५ मतदारांनाच गणना अर्ज वाटप करू शकले आहेत. त्यातील ३५ लाख अर्जांचे डिजिटायझेशन पूर्ण झाल्याची माहिती जिल्हा निवडणूक शाखेकडून देण्यात आली.**

# पुणे जिल्ह्यात साडेअकरा हजार जन्म-मृत्यू दाखले खोळंबले!

## स्थानिक स्तरावरून जिल्हा स्तरावर अर्जांचा ओघ वाढल्याने सीआरएस पोर्टलवर ताण; जिल्हा सांख्यिकी अधिकाऱ्यांची कामाबाबत असमर्थता.

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्यात जन्म- मृत्यू फेरफारची सुमारे ११,५०० प्रकरणे निरस्तच्या प्रतीक्षेत असून, मनुष्यबळाचा अभाव आणि काहीअंशी राजकीय दहशतीचा परिणाम म्हणून ही प्रकरणे निकाली निघत नसल्याची स्थिती आहे. यामुळे अनेक मुलांचे ॲडमिशन, पासपोर्टची आणि अन्य अनेक कामे खोळंबल्याने संताप व्यक्त केला जात आहे. केंद्राच्या सिव्हिल रजिस्ट्रेशन सिस्टिम (सीआरएस) पोर्टलवरील ऑपरेशन्सला मर्यादा येत असून,

जिल्हा सांख्यिकी अधिकाऱ्यांनी हे पोर्टल वेगाने हाताळण्याबाबत असमर्थता दर्शवली आहे. याबाबत त्यांनी महाराष्ट्र राज्य आरोग्य सांख्यिकी संवर्ग संघटनेलाही लेखी कळवूनही काहीच उत्तर मिळत नसल्याची तक्रार अधिकाऱ्यांकडून होत आहे. वास्तविक फेरफारचा अधिकार महापालिका, नगरपालिका, पंचायत समिती स्तरावरील निबंधकांना अधिकार आहे.




### ११,५०० फेरफार प्रकरणे प्रलंबित

**» पुणे जिल्ह्यात जन्म-मृत्यू नोंदीतील फेरफाराची सुमारे ११ हजार ५०० प्रकरणे प्रलंबित आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांचे प्रवेश, पासपोर्ट, शासकीय कागदपत्रे व इतर महत्त्वाची कामे रखडली आहेत. नावातील बदल, दुरुस्ती आणि इतर फेरफारासाठी जिल्हा स्तरावर मोठ्या प्रमाणात अर्ज प्रलंबित असल्याने नागरिकांना वारंवार कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागत आहेत. या विलंबामुळे सर्वसामान्यांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले असून, प्रकरणांचा तातडीने निपटारा करण्याची मागणी जोर धरत आहे.**

त्यामध्ये वेलांटी, उकार, अनुस्वार किंवा इंग्रजीतील स्पेलिंगमधील बदल ते करू शकतात; परंतु नावात बदल किंवा अन्य महत्त्वाच्या बदलांसाठी अर्ज जिल्हा स्तरावर अर्ज पाठवले जातात. मात्र, आता या सगळ्या संस्थांकडून जवळपास सगळेच अर्ज हे जिल्हा स्तरावर पाठवल्यामुळे ते निरस्त करण्यास वेळ लागत आहे. ही समस्या संपूर्ण महाराष्ट्रातच निर्माण झाली आहे.

पुणे जिल्ह्यातील ३१ दिवसांवरील ते एक वर्षामधील सर्व जन्म मृत्यू नोंदणीचे काम मंजुरीसाठी सीआरएस पोर्टलद्वारे पुणे जिल्हा निबंधक यांच्या लॉगइनला येते. मात्र, आठ जूनपासून नव्या नोंदणीपासून ते जुन्या देखील जन्म-मृत्यू प्रमाणपत्रांच्या डिजिटायझेशन आणि डिजिटल प्रती जारी करण्यासंदर्भातील सर्व नोंदी मान्यतेसाठी जिल्हा निबंधकांकडे येत आहेत. त्यामुळे या विभागावर ताण निर्माण झाला आहे.

माजी मंत्री किरीट सोमय्या हे प्रत्येक महापालिकेत जाऊन या प्रकरणांचा आढावा घेत आहेत; परंतु प्रत्यक्षात या कामासाठी लागणारे मनुष्यबळ आणि तांत्रिक गोष्टींची पूर्तता होत नसल्याने या गोष्टी वेगाने होत नाहीत. चुकीचे फेरफार झाल्यास नोकरीवर जाईल, पोलीस केस होईल, या भीतीतून या अधिकाऱ्यांनीही जबाबदारी ढकलण्याचा प्रयत्न सुरू केला आहे.

> **“ही प्रकरणे लवकर निरस्त होण्यासाठी जिल्हा सांख्यिकी अधिकाऱ्यांनी येणाऱ्या अडचणींबाबत महाराष्ट्र राज्य आरोग्य सांख्यिकी संवर्ग संघटनेला लेखी कळवले आहे. संपूर्ण जिल्ह्यातील जुन्या नोंदी एकाच ठिकाणी मंजुरीसाठी आल्याने कामाचा व्याप वाढला आहे. नागरिक आणि स्थानिक लोकप्रतिनिधींमार्फत दाखल्यांची वारंवार मागणी होत असल्याने इतर नियमित कामांवर परिणाम झाला आहे.”**
>
> **- प्राजक्ता जाधव, सांख्यिकी अधिकारी, जिल्हा परिषद**

> **“जिल्हा निबंधकांची या नोंदींना मंजुरी देण्याबाबत कोणतीही कायदेशीर तरतूद दिसून येत नाही. शिवाय जिल्हा स्तरावर हे रेकॉर्ड उपलब्ध नाही. अशा परिस्थितीत जिल्हा स्तरावरून मंजुरीची तरतूद का केली आहे, हा मूळ प्रश्न आहे.”**
>
> **- डॉ. रामचंद्र हंकारे, जिल्हा निबंधक, जन्म-मृत्यू**

# पुण्यात पावसाचा जोर वाढला.! खडकवासला धरणातून मुठा नदीत 3,825 क्युसेक पाण्याचा विसर्ग

## खडकवासला धरणाच्या सांडव्यावरून मुठा नदीपात्रात 3,825 क्युसेक वेगाने पाण्याचा विसर्ग सुरु करण्यात येणार आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे शहर आणि जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून पावसाचा जोर कायम असून, धरणाच्या पाणलोट क्षेत्रात होत असलेल्या अतिवृष्टीमुळे खडकवासला धरणातील पाणीपातळीत झपाट्याने वाढ होत आहे. या पार्श्वभूमीवर आज, गुरुवार 23 जुलै 2026 रोजी रात्री 8 वाजता खडकवासला धरणाच्या सांडव्यावरून मुठा नदीपात्रात 3,825 क्युसेक वेगाने पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात येणार आहे.

पुणे शहरासह घाटमाथा आणि धरणांच्या पाणलोट क्षेत्रात पावसाचा जोर कायम असल्याने धरणात येणाऱ्या पाण्याच्या प्रवाहात वाढ झाली आहे. त्यामुळे परिस्थितीनुसार मुठा नदीतील



विसर्ग कमी किंवा अधिक करण्याची शक्यता प्रशासनाने व्यक्त केली आहे. पुणे शहरातही पावसामुळे अनेक भागांमध्ये पाणी साचण्याची तसेच नदीपात्रातील पाणीपातळी वाढण्याची शक्यता आहे.

या पार्श्वभूमीवर नदीकाठच्या आणि सखल भागातील नागरिकांनी विशेष खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. नागरिकांनी कोणत्याही परिस्थितीत मुठा नदीपात्रात उतरू नये. नदीपात्रात, नदीकाठावर किंवा संभाव्य पूरप्रवण भागात असलेले साहित्य, वाहने तसेच जनावरे तात्काळ सुरक्षित ठिकाणी हलवावीत.

सखल भागातील नागरिकांना स्थानिक प्रशासन, पोलीस आणि संबंधित यंत्रणांनी सतर्कतेच्या सूचना द्याव्यात, तसेच आवश्यक ती प्रतिबंधात्मक कार्यवाही करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. पावसाचा जोर, धरणात होणारी पाण्याची आवक आणि नदीपात्रातील परिस्थिती यावर प्रशासना चे लक्ष असून, नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता अधिकृत सूचनांचे पालन करावे. असं देखील सांगण्यात आलं आहे.

### नागरिकांसाठी महत्त्वाच्या सूचना

**» खडकवासला धरणातून रात्री ८ वाजता ३,८२५ क्युसेक वेगाने पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात येणार असल्याने मुठा नदीकाठच्या नागरिकांनी विशेष सतर्कता बाळगावी. नदीपात्रात किंवा नदीकाठावर कोणत्याही परिस्थितीत जाऊ नये. नदीकाठावरील वाहने, जनावरे, शेतीची अवजारे व इतर साहित्य तातडीने सुरक्षित ठिकाणी हलवावे. सखल भागातील नागरिकांनी प्रशासन, पोलीस आणि आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या सूचनांचे काटेकोर पालन करावे. पावसाच्या प्रमाणानुसार विसर्गात वाढ किंवा घट होऊ शकते. त्यामुळे अफवांवर विश्वास न ठेवता केवळ अधिकृत माहितीनुसारच कृती करावी आणि आवश्यक ती खबरदारी घ्यावी.**